महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सांगवी (सु.) ता.अहमदपूर, जि.लातूर या वसतिगृहाच्या मान्य विद्यार्थी संख्या वाढीस मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीएच -२०१५/ प्र.क्र. १८९/शिक्षण-२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : ३० डिसेंबर, २०१५

वाचा -

१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रीडा विभाग, क्र.बीसीएच-१०९७ / प्र.क्र.१०५/मावक-४, दि. १६ मार्च, १९९८
२) शासन शुध्दिपत्रक क्रमांक:- बीसीएच-२०१२/प्र.क्र.१२५/मावक-४, दि.३ सप्टेंबर,२०१२
३) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचे पत्र क्र: सकआ/ शिक्षण/ अनुवगृह/ मासंवा/ का-५/ २०१५/ ११५५, दि.२२.०५.२०१४.

प्रस्तावना -

संदर्भाधिन अनु क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना मान्यता व अनुदान ही योजना राबविण्यात येते. या शासन निर्णयातील जोडपत्र-अ मधील नियम क्रमांक ८ (ग) मध्ये शासन शुध्दिपत्रक दि.३ सप्टेंबर,२०१२ अन्वये बदल करण्यात आला असून त्यानुसार मान्यता प्राप्त अनुदानित मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या मंजूर संख्येत वाढ करण्यात येते. त्यामध्ये उपरोक्त शासन निर्णय त्यास अनुसरुन लातूर जिल्ह्यातील गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, मांडुरकी, ता.अहमदपूर, जि.लातूर संचलित महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सांगवी (सु.) ता.अहमदपूर, जि.लातूर या अनुदानित वसतिगृहाच्या मान्य विद्यार्थी संख्येत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय -

उपरोक्त प्रस्तावाचा सखोल विचार करुन तसेच लातूर जिल्ह्यातील उपलब्ध विद्यार्थी संख्या विचारात घेऊन लातूर जिल्ह्यातील खालीलप्रमाणे अनुदानित वसतिगृहास विद्यार्थी संख्या वाढवून देण्यास याद्वारे शासन मान्यता देत आहे :-

संस्थेचे व वसतिगृहाचे नाव	सध्या मंजूर विद्यार्थी संख्या	मान्य विद्यार्थी संख्येत वाढ करण्यास मान्यता दिलेली संख्या	वाढीनंतर एकूण विद्यार्थी संख्या
गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, मांडुरकी, ता.अहमदपूर, जि.लातूर संचलित महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सांगवी (सु.) ता.अहमदपूर, जि.लातूर	२४	२४	४८

२. या योजनेसंबंधी शासन निर्णय दि. १६ मार्च, १९९८ व दि.३/०९/२०१२ मधील तरतूदीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अनुदान निर्धारण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि सदर खर्च प्रतिवर्षी मंजूर होणाऱ्या आर्थिक तरतूदीमधून भागवावा.

३. सदर वसतिगृहास दिलेल्या संख्यावाढीसाठी कोणतीही जादाची पदे अनुज्ञेय राहणार नाहीत. तसेच, अतिरिक्त २४ विद्यार्थी संख्येस राहण्याची व भोजनाची व्यवस्था संस्थेने त्वरीत करावी. सदर व्यवस्था करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबतची खात्री जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांनी करून त्याबाबतचा अहवाल आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत २ महिन्यांचे आत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१५१२३०१६४२१०२६२२** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pratap P Lubal

Digitally signed by Pratap P Lubal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pratap P Lubal
Date: 2016.01.01 13:06:11 +05'30'

(प्र.पां.लुबाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव,
२. प्रधान सचिव,सा.न्या.व वि.स.विभाग, मंत्रालय ,मुंबई
३. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
८. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
१०.अध्यक्ष, गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, मांडुरकी, ता.अहमदपूर, जि. लातूर
११.निवड नस्ती.